**गीत ः लगबग चालली** **चित्रपट ः चंदना**

**गायक ः राजेश्वरी पवार, ॐकारस्वरूप बागडे , सुहित अभ्यंकर** **शब्द ः संगीता बर्वे** **संगीत ः सुहित अभ्यंकर**

लगबग चालली नटखट पोर गं, उगाच माहया जीवा लागला घोर गं

नवसाची पोर गं चंदराची कोर गं ,झटपट नेईल कोणी चितचोर गं

फुललं, झुललं वय हे खुळं...

पीरतीत न्हालं जी,जी बावरून गेलं जी

मोहरून आलं जी कसं सावरू. . .

वहरून आलं जी, उडूनिया गेलं जी

सैरभैर झालं जी मन पाखरू. . .

एवढीशी पोरं ती आलीया वयात गं, बोलताना हसती स्वःताशीच गात गं

सारखीच पाहती ती रोजच आरशात गं,रोज आरशात गं आलीया वयात गं

कुणी तीला न्यायला गं येईल... येईल...येईल

हळदीच्या पावलांनी जाईल ...जाईल ...जाईल

गुणी माझी पोर गं, जराशी मुजोर गं

नाचतोय मनी तिच्या सतरंगी मोर गं, जगणं रंगलं तिच्याच मुळं

सौख्य लेणं ल्यालं जी, रमूनीया गेलं जी

कणखर झालं जी माझं लेकरू

वहरून आलं जी उडूनिया गेलं जी ,सैरभैर झालं जी मन पाखरू